राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र : १/२०२५/अहिल्यानगर

तक्रारदार	प्रतिवादी जन माहिती अधिकारी
श्री. एकनाथ भिमाजी राहणे, रा. मु. पो. चंदनापुरी, ता. संगमनेर , जि. अहिल्यानगर	मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, शेलद, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

सुनावणी दिनांक १८/०३/२०२६

तक्रारदार यांनी दिनांक ०१/०१/२०२५ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८/०३/२०२६ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित होते. तर विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक ०१/०१/२०२५ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "दिनांक २४/०९/२०२४ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. तरी कलम २०(१) नुसार प्रतिदिन रु. २५०/- प्रमाणे शास्ती आकारावी कलम २० (२) नुसार शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करावी कलम १९ (८) ख नुसार तक्रारदारास रु.५०,०००/- नुकसान भरपाई मिळावी व संपूर्ण शालेय दप्तराची तपासणी करण्याचे आदेश दयावेत ही नम्र विनंती."

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २४/०९/२०२४ च्या मूळ माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"दि.०१/०६/२०२१ ते दि. ३१/०५/२०२४ या कालावधीच्या मस्टरच्या झेरॉक्स प्रती माहिती अधिकाराचा लोगो वापरून सही शिक्क्यानिशी प्रमाणित केलेल्या प्रती मिळाव्यात."

४) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांच्या दिनांक २४/०९/२०२४ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, शेलद, ता. अकोले, जि. अहिल्यानगर, यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास येते. तसेच, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नसल्याचे दिसून येते. प्रत्यक्ष सुनावणीवेळी विद्यमान/तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून सुनावणीपूर्वी प्रस्तूत प्रकरणी त्यांनी कोणताही अहवाल आयोगास सादर केला नसल्याकारणाने प्रस्तूत प्रकरणाची वस्तूस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही.

तसेच, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खालील नमूद आदेशाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अंतर्गत तक्रारीमध्ये थेट माहिती देण्याचे आदेश पारीत करता येत नाही.

In the case of Chief Information Commissioner-Vs-State of Manipur (AIR 2012 SC 864), the Hon'ble Supreme Court has observed that a complaint under Section 18 of the Right to Information Act, 2005, could not be treated as appeal under Section 19 and, therefore Information Commissioner while entertaining a complaint under Section 18 of the Act has no jurisdication to pass an order providing for access to information.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार तक्रारीत माहिती देण्याचे आदेश पारीत होत नाही. त्यामुळे तक्रारकर्ता यांनी तक्रारअर्जान्वये केलेली माहिती देण्याची विनंती मान्य करता येत नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, शेलद, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी तक्रारदार यांच्या दिनांक २४/०९/२०२४ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरून कोणतीही कार्यवाही केली नसून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नाही म्हणून त्यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील याची नोंद घ्यावी.

२) वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार **क्र. ०६/२०२५/नाशिक** निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ३३८७ १५.०८।०५।२०२६